नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३७ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# एफसीआरएवर खडाजंगी अटळ

## लोकसभेत विधेयकावर या आठवड्यात चर्चेची शक्यता



**नवी दिल्ली : (स. गांवकरी)**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा सोमवारपासून सुरू होणारा अखेरचा आठवडाही वादळी ठरण्याची शक्यता आहे. तसेच, या आठवड्यामध्ये वादग्रस्त परदेशी योगदान नियमन दुरुस्ती विधेयकावर (एफसीआरए) लोकसभेत चर्चा होण्याची शक्यता आहे. या विधेयकाला 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांनी तीव्र विरोध केला आहे. विद्यमान विधेयक मागे घेतले जावे किंवा सविस्तर चर्चेसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. काँग्रेसने १०, ११ व १२ ऑगस्ट असे तीन दिवस व्हीप जारी केला असून संसदेमध्ये महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा होणार असून सभागृहांमध्ये उपस्थित राहण्याचा आदेश पक्ष खासदारांना दिला आहे. 'एफसीआरए' विधेयकासह आणखी दोन विधेयके केंद्रीय गृहमंत्रालयाकडून मांडली जाणार आहेत. गेल्या आठवड्यामध्ये 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा अपमान फौजदारी गुन्हा ठरवणारे विधेयक गृहमंत्रालयाने मांडले होते. पण, चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शहांऐवजी राज्यमंत्री नित्यानंदन राय यांनी उत्तर दिले होते. मात्र, 'एफसीआरए'सारख्या अत्यंत महत्त्वाच्या विधेयकाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उत्तर देण्याची विरोधकांना अपेक्षा आहे. हे विधेयक मार्च २०२६मध्ये लोकसभेत मांडले गेले होते. या विधेयकावर येत्या आठवड्यामध्ये चर्चा होण्याची शक्यता आहे. सोमवारी गृहमंत्रालयाशी निगडित अन्य दोन विधेयके मांडली जाण्याची शक्यता असून या विधेयकांवरील चर्चेला अमित शहांनी उत्तर दिले तर त्यानिमित्ताने ते या अधिवेशनामध्ये पहिल्यांदाच लोकसभेच्या सभागृहात उपस्थित राहतील. जंतर-मंतरच्या आंदोलकांवर मोर्चामध्ये झालेल्या मारहाणीची जबाबदारी घेऊन निवेदन देण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. सभागृहांमध्ये विरोधक शहांविरोधात आक्रमक होण्याची शक्यता आहे. कॅथॉलिक चर्चशी संबंधित संस्थांनी या विधेयकातील तरतुदींना तीव्र आक्षेप नोंदवला आहे. गेल्या आठवड्यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर द्रमुकचे राज्यसभेतील खासदार पी. विल्सन यांच्या नेतृत्वाखाली अल्पसंख्याक संयुक्त कृती मंचच्या शिष्टमंडळाने चर्चा केली होती. मिझोरामचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांच्या शिष्टमंडळानेही गेल्या गुरुवारी शहांशी चर्चा केली होती. हा कायदा पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू केला जाणार नाही असे आश्वासन शहांनी दिल्याची माहिती लालदुहोमा यांनी दिली. परदेशी योगदानाचे नियमन अधिक पारदर्शी असावे या दृष्टीने हे दुरुस्ती विधेयक आणले जात असल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. मात्र, परदेशी योगदान (नियमन) दुरुस्ती विधेयक, २०२६ (विधेयक क्रमांक ९७, २०२६) मधील प्रकरण ३ इ आणि प्रस्तावित कलम १४ बी संपूर्णपणे मागे घेण्यात यावेत; तसेच विदेशी योगदान (नियमन) कायदा, २०१० मधील विद्यमान कलम १५ रद्द करण्यात यावे, जेणेकरून परदेशी निधी किंवा संबंधित मालमत्ता कोणत्याही स्वरूपात सरकारकडे किंवा इतर प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याची तरतूद अस्तित्वात राहणार नाही.

### विरोधकांचा आक्षेप

- 'एफसीआरए' विधेयकाला काँग्रेससह 'इंडिया' आघाडीतील इतर पक्षांनी विरोध केला आहे. संसदेत या विधेयकावर चर्चा झाली तर काँग्रेस विरोध करेल.
- यासंदर्भात सोमवारी सकाळी होणाऱ्या 'इंडिया'आघाडीच्या गटनेत्यांच्या बैठकीमध्ये रणनीती निश्चित केली जाईल, असे काँग्रेसचे पक्षाध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी स्पष्ट केले.
- हे विधेयक जनविरोधी असून स्वयंसेवी संस्था तसेच, अल्पसंख्य समाजालाही लक्ष्य केले जाण्याचा मोठा धोका या विधेयकामुळे निर्माण झालेला आहे, असा आरोप काँग्रेसने केला आहे. * 'द्रमुक', तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आदी पक्षांनीही विधेयकाच्या विरोधात भूमिका घेतली आहे.

## थोडक्यात...

### कोंडीत अडकून पर्यटकाचा मृत्यू

सावंतवाडी (स. गांवकरी) : आंबोली येथे वर्षा पर्यटनासाठी आलेल्या एका पर्यटकाचा सर्पदंश झाल्यानंतर वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. गंगाधर मरपा (वय ३८, रा. हंपी, कर्नाटक) असे मृत पर्यटकाचे नाव आहे. वर्षा पर्यटनाच्या शेवटच्या वीकेंडला आंबोलीत झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका तब्बल अडीच तास अडकून पडल्याने प्रशासनाच्या नियोजनाचा बोजवारा उडाल्याचे स्पष्ट झाले आहे. गंगाधर मरपा हे आपल्या कुटुंबीयांसह आंबोली धबधबा परिसरात पर्यटनासाठी आले होते. मुख्य धबधब्याच्या बाजूला असलेल्या अंधाऱ्या भागात ते असताना त्यांना सापाने चावा घेतला. सर्पदंश झाल्यानंतर त्यांना तात्काळ आंबोली प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, तेथे पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला.

### कुठे छापा टाकायचा याची FDA ला माहिती कशी मिळते?

मुंबई (स. गांवकरी) : तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून अनेक ठिकाणी भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात कारवायांचा धडाका सुरू आहे. भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, भेसळयुक्त मिठाई, हॉटेलवरील निकृष्ट दर्जाचं जेवण, गुटखा विक्रीवर छापे अशा अनेक कारवाया एफडीएकडून करण्यात येत आहेत. मात्र, एफडीएला छापा टाकण्यासाठी आधी माहिती कशी मिळते? कुठे छापा टाकायचा यासाठी तक्रारी कशा पद्धतीने येतात? त्यावर कार्यवाही कशा पद्धतीने केली जाते? याबाबत तुकाराम मुंढे यांनी मुलाखतीत बोलताना महत्वाचं भाष्य केलं आहे. तुम्ही कारवाई करत असताना टार्गेट कसं ठरवता? म्हणजे एखाद्या ठिकाणी छापा टाकायचा असेल तर त्याची माहिती कशी मिळते? या प्रश्नावर बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "आपण वेगवेगळ्या माध्यमातून कारवाई करत असतो. आता मी जेव्हा अन्न व औषध प्रशासन विभागाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा मी आधी विभागाची भूमिका समजून घेतली. विभागाने काय करावं? याचा एक गोल ठरवून घेतला. त्यामध्ये आम्ही काही गोष्टी ठरवल्या."

### अहिल्यानगर शहरात तणाव व बंद

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील मुकुंदनगर भागात टोळक्याच्या मारहाणीत जखमी झालेल्या धीरज परदेशी या तरुणाचा उपचारादरम्यान आज, रविवारी मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूची माहिती पसरताच शहरात तणाव निर्माण झाला. सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालयाबाहेरच ठिय्या देत शहर बंदची हाक दिल्यानंतर शहराच्या बाजारपेठांतील दुकाने तातडीने बंद करण्यात आली. महापालिका कर्मचारी संघटनेने बेमुदत संपाचा निर्णय जाहीर केला. दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक मम्मुका सुदर्शन यांनी नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे तर पोलीस उपअधीक्षक डॉ दिलीप टिपसे यांनी चार आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती दिली. बंदचे आवाहन करणाऱ्या सकल हिंदू समाजाच्या दोघा युवकांना मारहाण झाल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी आमदार संग्राम जगताप व आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली सायंकाळी पुन्हा जुन्या बसस्थानकाजवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर ठिय्या देऊन रस्ता अडवला.

## कोट्यवधींचा खर्च; कामे मात्र दर्जाहीन?

### मुंबई-गोवा महामार्गावरील नव्या पुलांना तडे गेल्याने संताप

**अलिबाग : (स. गांवकरी)**



मुंबई-गोवा महामार्गावरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलांच्या कामांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नव्याने बांधलेल्या पुलांना तडे आणि भगदाडे पडल्याने कामाच्या दर्जाबाबत नाराजी आहे. वडखळ येथे बाह्यवळण मार्गावर उभारण्यात आलेल्या पुलाचा स्लॅब कोसळल्याने भगदाड पडल्याची बाब समोर आली. त्यामुळे पुलाच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. महामार्ग प्राधिकरणाने रातोरात हे भगदाड बुजवून तात्पुरती मलमपट्टी केली.

नागोठणेत नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाला तडे गेले असून वाहतुकीसाठी तो खुला केल्यानंतर दोन महिन्यांत हा पूल वापरासाठी बंद करण्यात आला. पुलाची पाहणी करण्यासाठी दिल्लीवरून विशेष पथकाला पाचारण करण्यात आले. जोपर्यंत त्यांचा अहवाल येत नाही तोपर्यंत पुलाची मार्गिका बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

लोणेरे येथे बांधण्यात आलेल्या पुलाला निकृष्ट दर्जाच्या कामामुळे भगदाड पडले. या खड्डयांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला. महामार्ग विभागाने या खड्डयांची दुरुस्ती सुरू केली असली तरी रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत आता प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले आहेत. नागोठणे, कोलाड आणि वडखळ येथील सेवा रस्त्यांची परिस्थिती खराब आहे. या मार्गांच्या देखभाल, दुरुस्तीकडे महामार्ग प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. माणगाव आणि इंदापूरच्या बाह्य वळण रस्त्यांची कामे अजूनही दृष्टिक्षेपात नाहीत. गणेशोत्सवापूर्वी या बाह्यवळण रस्त्यांची किमान एक मार्गिका पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असले तरी कामाची गती वाढवल्याशिवाय हे काम पूर्ण होणे कठीण आहे. २०११ मध्ये मुंबई-गोवा महामार्गाचे पहिल्या टप्प्यातील काम तर २०१४ मध्ये दुसऱ्या टप्प्यातील काम सुरू झाले होते. १५ वर्षं होत आली तरी हे काम पूर्ण झालेले नाही. दरवर्षी पावसाळ्यात महामार्गाची दुरवस्था होते. गणेशोत्सवात सुरक्षित प्रवासाची आश्वासने दिली जातात. काम पूर्ण करण्यासाठी नवनवीन मुदती जाहीर केल्या जातात. मात्र काम काही पूर्णत्वाकडे जात नाही.

> या रस्त्याला कोणी वाली नाही. सरकार मोठ्या कॉरिडोर आणि शक्तिपीठ मार्गाच्या घोषणा करते, पण पंधरा वर्षांनंतरही मुंबई-गोवा महामार्ग काही पूर्ण होत नाही. वडखळ- अलिबाग सेवा रस्त्याची परिस्थिती दयनीय आहे. यंत्रणांचा निषेध करावा तेवढा थोडा आहे.
> **- दिलीप जोग, सामाजिक कार्यकर्ते**

## काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांच्या नावाने भाजप सरकारचे जलसंधारण अभियान

**मुंबई : (स. गांवकरी)**



राज्याच्या राजकारणात ठसा उमटविण्याबरोबरच 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा मूलमंत्र देत जलसंधारणाची मोठी चळवळ उभारणारे काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी म्हणजे २१ ऑगस्टला यापुढे राज्याचा जलसंधारण दिन साजरा केला जाणार आहे. विशेष म्हणजे यात तरूणांना सहभागी करून घेतले जाणार असून, एरवी प्रत्येक सरकारी कार्यक्रमात सक्तीच्या असलेल्या 'सेल्फी'ऐवजी एक लाख 'रिल्स' बनविण्याचे आवाहन तरूणांना करण्यात आले आहे. नाईक यांनी जलसंधारणाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे मृद व जलसंधारण विभागाने काढलेल्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. सुधाकरराव नाईक यांनी राज्यातील खालावलेली भूजल पातळी आणि पाणीटंचाईवर उपाय म्हणून मोठ्या धरणांना प्राधान्य देण्याऐवजी पाणलोट क्षेत्राचा विकास करत भूजल पुनर्भरणावर भर दिला. मृद आणि जलसंधारण हे शेती, पर्यावरण, व शाश्वत विकासाचा पाया आहे. त्याचे भविष्यातील पिढीकरिता रक्षण करण्याकरिता १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह आणि १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान जलसंधारण अभियान आयोजिण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा भाग म्हणून २१ ऑगस्टला राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात येणार आहे.

## शक्तीपीठ महामार्ग कोकण व गोव्याला जोडण्यासाठी पुनर्सर्व्हेची मागणी

### आमदार दीपक केसरकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**सावंतवाडी : (स. गांवकरी)**



शक्तीपीठ महामार्ग उत्तर व दक्षिण गोवा, रेडी बंदर, मुंबई-गोवा महामार्ग, कोकण एक्स्प्रेस महामार्ग आणि सागरी महामार्गाशी जोडला जावा, यासाठी पुनर्सर्व्हेची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात लवकरच सर्वेक्षण होऊन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या बैठकीत कोकणसह राज्याच्या हिताचा निर्णय घेतला जाईल, असा विश्वास आमदार दीपक केसरकर यांनी व्यक्त केला. सावंतवाडी येथील संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख संजू परब उपस्थित होते.

मुंबईत झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (MSRDC) व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्याकडे ही मागणी मांडण्यात आली असून त्यांनी पुन्हा पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत. सध्याच्या आराखड्यानुसार या महामार्गाचा स्थानिक व्यापार व बंदरांना अपेक्षित फायदा होणार नाही. त्यामुळे हा महामार्ग मळगाव येथून रेडी बंदर, मुंबई-गोवा महामार्ग व प्रस्तावित कोकण एक्स्प्रेस हायवेला जोडल्यास रेडी बंदराची मालवाहतूक, स्थानिक पर्यटन आणि अर्थकारणाला मोठी गती मिळेल, असे केसरकर यांनी सांगितले.

बांदा भागातील शेतकऱ्यांचा विरोध आणि फळबागायतींचे होणारे नुकसान टाळण्यासाठी मार्गात बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. नवीन आराखड्यानुसार आंबोली, चौकुळ पठार, मोर्ले-पारगड व तिलारी मार्गे हा महामार्ग उत्तर आणि दक्षिण गोव्याला जोडला जाईल. यामुळे चौकुळ व दोडामार्ग तालुकाही मुख्य प्रवाहात येईल. सावंतवाडी रेल्वे टर्मिनस, मळगाव, न्हावेली आणि निरवडे परिसरासाठी नाबार्डच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.

भूमिगत वीज वाहिनी, ५६ टक्के हरित आच्छादनामुळे वादळात वीज खंडित होण्याचे प्रमाण जास्त आहे. यासाठी ११५ कोटी रुपयांचा अंडरग्राउंड केबलचा प्रस्ताव आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पाठवण्याचे निर्देश ऊर्जा राज्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत देण्यात आले आहेत. या केबल्स जंगलाऐवजी महामार्गावरून टाकल्या जातील. दोडामार्ग तालुक्यातील कमी व्होल्टेजचा प्रश्न सोडवण्यासाठी 'निरंतर वीज योजने'अंतर्गत गणेशोत्सवापूर्वी ८० नवीन ट्रान्सफॉर्मर बसवले जातील. तसेच आंबोली व चौकुळ गावांसाठी स्वतंत्र वीज वाहिनी व ब्रेकर्स मंजूर करण्यात आले आहेत.

# मराठा आरक्षणाची पुन्हा नव्याने सुनावणी

## न्यायमूर्ती घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून शिफारस

**मुंबई : (स. गांवकरी)**



मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांची पदोन्नतीवर कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केंद्र सरकारकडे केली आहे. तथापि, न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठापुढे सध्या सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याबाबत गेले वर्षभरापासून नियमित सुनावणी आहे. त्यामुळे, न्यायमूर्ती घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी शिफारस झाल्याने मराठा आरक्षणाबाबतची सुनावणी पुन्हा एकदा नव्याने सुरू करावी लागेल.

सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याचा सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सुरूवातीला या प्रकरणी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. नंतर, तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय पूर्णपीठापुढे प्रकरणाची अंतिम सुनावणी सुरू झाली. परंतु, न्यायमूर्ती उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयात बदली झाल्यानंतर प्रकरणाची सुनावणी प्रलंबित होती. दरम्यान, मराठा नेते मनोज जरांगे यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मुंबईत केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांचे विशेष पूर्णपीठ प्रकरणाच्या सुनावणीसाठी स्थापन करण्यात आले. तेव्हापासून या विशेष पूर्णपीठापुढे मराठा आरक्षणासंदर्भात नियमित सुनावणी सुरू आहे. याचिकाकर्त्यांसह आरक्षणाला विरोध करणाऱ्या पक्षकारांचा युक्तिवाद पूर्ण झाला असून सध्या राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांचा युक्तिवाद सुरू आहे. तथापि, न्यायमूर्ती घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून शिफारस करण्यात आल्याने या प्रकरणासाठी आता नव्याने पूर्णपीठ स्थापन करावे लागेल आणि प्रकरणाची पुन्हा नव्याने सुनावणी घ्यावी लागेल. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत न्यायमूर्ती घुगे यांच्या नावाची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी शिफारस केली, तर अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून शिफारस केली. केंद्र सरकारने त्यांच्या नियुक्त्यांना मंजुरी दिल्यानंतर आणि त्याबाबतची अधिसूचना काढल्यानंतर न्यायमूर्ती घुगे आणि न्यायमूर्ती त्रिपाठी हे कोलकत्ता आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून पदभार सांभाळतील.

### न्यायमूर्ती त्रिपाठी मुंबई उच्च न्यायालयाचे ५०वे मुख्य न्यायमूर्ती

न्यायमूर्ती त्रिपाठी हे सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्तींनंतरचे दुसरे सर्वात ज्येष्ठ न्यायमूर्ती म्हणून कार्यरत आहेत आणि त्यांनी अलाहाबाद येथील उच्च न्यायालयाच्या मुख्य खंडपीठाचे कामकाज पाहिले आहे. ते मुंबई उच्च न्यायालयाचे ५०वे मुख्य न्यायमूर्ती असतील. न्यायमूर्ती त्रिपाठी यांनी १९९० मध्ये लखनऊ विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली आणि ११ जानेवारी १९९२ रोजी वकील म्हणून नोंदणी केली. त्यांनी दिवाणी प्रकरणे प्रामुख्याने लढवली आहेत आणि ऑक्टोबर २००७ पासून उत्तर प्रदेशचे अतिरिक्त स्थायी वकील म्हणून कार्यरत होते. त्यानंतर, २७ सप्टेंबर २०१३ रोजी त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली आणि १० एप्रिल २०१५ रोजी ते कायमस्वरूपी न्यायमूर्ती म्हणून काम पाहत आहेत.

## महिनाभरात महावितरणाला हजारो कोटींचे आर्थिक बळ

**मुंबई : (स. गांवकरी)**



तब्बल ४८ हजार कोटींची कृषी वीज देयकांची थकबाकी माफ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकारकडून कृषी वीज योजनांसाठी निधीचा ओघ सुरूच असून, त्यासाठी महिनाभरात हजारों कोटींचे आर्थिक बळ महावितरणला देण्यात आले आहे. महावितरणच्या शेअर बाजारातत सूचिबद्ध होण्याच्या प्रयत्नांना यामुळे बळकटी मिळणार आहे. या वर्षाच्या अखेरीस महावितरणचा आयपीओ बाजारात आणण्याचा प्रयत्न आहे.

शेअर बाजारातून तब्बल १० हजार कोटींचे भांडवल उभारण्याची महावितरणची (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित) योजना आहे. त्याकरिता कंपनीचा आर्थिक ताळेबंद सुधारण्याच्या प्रयत्नांना वेग आला आहे. वीज देयक थकबाकी माफीने महावितरणच्या ताळेबंदावरील मोठा भार कमी केला. आता कृषी वीज व्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी सरकारकडून समांतर आर्थिक पाठबळ दिले जात आहे.

राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंप ग्राहकांना मोफत वीज देण्यासाठी चालू आर्थिक वर्षात हजारो कोटींची तरतूद आहे. त्याचबरोबर 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून दिला जात आहे. या योजनेअंतर्गत पाच वर्षांत पाच लाख पारेषणविरहित सौर कृषीपंप बसविण्याचे उद्दिष्ट आहे. मे २०२६ अखेर त्यापैकी ३ लाख १७ हजार १२२ पंप बसविण्यात आले होते. या योजनेसाठी राज्य सरकारने ७९३ कोटी ७९ लाख महावितरणला उपलब्ध करून दिले आहेत. त्याचवेळी कृषी वितरण प्रणालीचे बळकटीकरण आणि सौर ऊर्जेसाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेकडून (एआयआयबी) घेतलेल्या कर्जाचा ५६२ कोटी ९० लाखांचा दुसरा हप्ता महावितरणला देण्यात येणार आहे. बँकेने या प्रकल्पासाठी एकूण ६,२११ कोटी ८० लाखांचे कर्ज देऊ केले आहे. त्यापैकी १,३६१ कोटींचा पहिला हप्ता मार्च, २०२६मध्ये देण्यात आला होता.

# नाशिक-पुणे रेल्वेसाठी जनसागर रस्त्यावर

## “६० दिवसांत निर्णय द्या, समितीला मुदतवाढ नको!” — आमदार सत्यजीत तांबे

“हा प्रश्न केवळ आजच्या आंदोलनाचा नाही. हा पुढच्या दोन-चार पिढ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. आज दोन-चार तास नागरिकांना त्रास झाला असेल; त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. मात्र हा संघर्ष भविष्यातील पिढ्यांसाठी आहे,” असे तांबे म्हणाले. नाशिक-पुणे रेल्वेचा प्रश्न आपण यापूर्वी विधान परिषदेत मांडला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समिती स्थापन करण्याची भूमिका घेतली होती, याचीही तांबे यांनी आठवण करून दिली.

- “५०० कोटींपेक्षा अधिक निधी वाटप, भूसंपादन झाले; मग प्रकल्प वळवण्याचा प्रश्न का?”
- समृद्धी महामार्गापासून चाकणपर्यंत चक्काजाम; मूळ मार्ग कायम ठेवण्याची नागरिकांची मागणी





नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग कोणत्याही परिस्थितीत बदलू नये, या मागणीसाठी आज क्रांती दिनाच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर तसेच समृद्धी महामार्गावरील गोंदे फाटा आणि सिन्नर परिसरात नागरिकांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन केले. विशेषतः तरुणांचा मोठा सहभाग या आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले. या आंदोलनाला संबोधित करताना आमदार सत्यजीत तांबे यांनी “ही कोणत्याही पक्षाची भूमिका नसून जनतेच्या अनेक वर्षांच्या मागणीचे जनआंदोलन आहे,” असे स्पष्ट केले. “नाशिक-पुणे रेल्वे ज्या मूळ मार्गाने प्रस्तावित झाली, त्याच मार्गाने ती झाली पाहिजे. कोणाच्याही दबावाखाली किंवा कोणत्याही कारणाने मार्ग बदलण्याचा प्रयत्न आम्ही स्वीकारणार नाही,” अशी ठाम भूमिका तांबे यांनी मांडली. नाशिक-पुणे रेल्वेच्या तांत्रिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला दिलेली ६० दिवसांची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवू नये आणि ठरलेल्या मुदतीत अहवाल द्यावा, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी असल्याचे तांबे यांनी सांगितले. “समिती नेमली आहे, हे स्वागतार्ह आहे. मात्र समितीला मुदतवाढ देऊन विषय पुन्हा लांबणीवर टाकला जाऊ नये. ६० दिवसांत स्पष्ट निर्णय झाला पाहिजे,” असे ते म्हणाले. समितीने केवळ जीएमआरटीसंदर्भातील तांत्रिक अडचणींचा अभ्यास न करता जनतेच्या भावना समजून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यात जनसंवाद घ्यावा, अशी दुसरी महत्त्वाची मागणी तांबे यांनी केली. या समितीत डॉ. अनिल काकोडकर यांच्यासोबत नाशिक व पुणे विभागीय आयुक्त तसेच रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे तांत्रिक बाबींसोबतच या भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, कामगार आणि तरुणांच्या अपेक्षांचाही विचार समितीने करावा, असे तांबे यांनी स्पष्ट केले. नाशिक-पुणे रेल्वेसाठी यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर भूसंपादनाची प्रक्रिया झाली असून ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीचे वाटप झाले आहे.

रेल्वे स्थानकांच्या कामांसाठी टेंडर प्रक्रियाही पुढे गेली आहे. प्रकल्प इतका पुढे गेलेला असताना अचानक तांत्रिक कारणांचा आधार घेत मार्ग बदलण्याचा प्रयत्न का केला जात आहे, असा सवाल तांबे यांनी उपस्थित केला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शिक्षणाधिकाऱ्यांची शाळेला सदिच्छा भेट; गुणवत्तावाढीसाठी मार्गदर्शन

पाथर्डी (स. गांवकरी) : माणिकदौंडी येथील श्री रत्न जैन विद्यालय शाळेला मा.गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांनी सदिच्छा भेट देऊन शाळेच्या शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून विविध शैक्षणिक बाबींवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकाऱ्यांनी केले. स्पर्धा परीक्षा तयारी, आदर्श परीपाठ, माजी विद्यार्थी व लोकसहभाग, डिजिटल साधनांचा वापर तसेच बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार अध्यापनाच्या नाविन्यपूर्ण पद्धतींचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. विद्यालयातील मुख्याध्यापकांकडून नवोदय, एन एम एम एस, शिष्यवृत्ती परीक्षा, सूप्त कलागुणांना वाव देण्यासाठी चित्रकला परीक्षा, विविध उपक्रम, शैक्षणिक प्रगती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती तसेच या शाळेतील विद्यार्थी दरवर्षी नवोदय परीक्षेत यश संपादन करतात, याची माहिती गटशिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या या सदिच्छा भेटीमुळे शिक्षकांना प्रेरणा मिळाली असून, शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अधिक उत्साहाने कार्य करण्याचा निर्धार शिक्षकांनी व्यक्त केला. यावेळी गटशिक्षणाधिकारी श्री कराड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक सुनिल मरकड, केंद्रप्रमुख विठ्ठल शिंदे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## 'शिवरत्न' सभागृहाचे नाव कायम ठेवण्याची मागणी



सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्हा परिषदेतील 'शिवरत्न' सभागृहाचे नाव बदलण्याचा करण्यात आलेला ठराव रद्द करून गेल्या अनेक वर्षांपासून प्रचलित असलेले 'शिवरत्न' हेच नाव कायम ठेवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली. निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर जिल्हा परिषदेमधील सभागृहाला सुमारे ४० वर्षांपूर्वी 'शिवरत्न' हे नाव देण्यात आले होते. हे नाव महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आले असून त्यास ऐतिहासिक व भावनिक महत्त्व आहे. अशा परिस्थितीत या सभागृहाचे नाव बदलण्याचा निर्णय हा सोलापूर जिल्ह्याच्या जनभावनांचा अनादर करणारा असून त्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, 'शिवरत्न' हे नाव बदलून भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्याचा ठराव करण्यात आला आहे. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाला कोणताही विरोध नसून, त्यांच्या नावाने नवीन वास्तू अथवा सभागृह उभारून त्यास नाव देण्यात यावे, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. मात्र, गेल्या चार दशकांपासून अस्तित्वात असलेले 'शिवरत्न' हे नाव कायम ठेवावे, अशी लोकशाही मार्गाने मागणी करण्यात आली. तसेच मुख्यकार्यकारी अधिकारी यांना भगवान शिवशंकर व छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवरत्न अशी फोटो प्रतिमा भेट देण्यात आले यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, कार्याध्यक्ष प्रशांत गायकवाड (दक्षिण सोलापूर), जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, उपाध्यक्ष प्रवीण इरत शेट्टी, विद्यार्थी संघटनेचे शहराध्यक्ष पद्मसिंह शिंदे, सामाजिक न्याय विभागाचे शहराध्यक्ष अजित पात्रे आदी उपस्थित होते.

## विद्यादानातून उज्ज्वल भविष्याची पायाभरणी!



नाशिक (स. गांवकरी) : महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयात महावीर इंटरनॅशनल व कार्यसम्राट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू, होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना वह्या, शालेय दप्तर, रेनकोट, वॉटर बॅग तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी होते.यावेळी महावीर इंटरनॅशनलचे संस्थापक अध्यक्ष अनिल नहार, अध्यक्षा डॉ. संगीता बाफणा, कार्यसम्राट फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा गीता शामसुखा, सेक्रेटरी ॲड. तुषार शामसुखा, अमोलकचंदजी भंडारी, राजेंद्र बाफणा, किशोर बाफणा, ॲड. ऋषभ शामसुखा, दर्शना आहेर, सुलोचना शिंदे, आरती पगारे, प्रमोद लव्हंगळे व बाळासाहेब चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

# प्रदिप माहाराज एम. ए. साहित्य परिषदेत संकृत परिक्षेत उतिर्ण

रावेर : (स. गांवकरी)

अध्यत्म कार्यासोबतच उच्च शिक्षणाची कास धरत खिर्डी येथील एका युवा मठाधिपतीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एम.ए. संस्कृत साहित्य परीक्षेत महाविद्यालयातून चौथा क्रमांक मिळवत ह.भ.प. प्रदीप महाराज पंजाबी यांनी परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे महानुभाव पंथीय समाजात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. रावेर तालुक्यातील खिर्डी येथील श्रीकृष्ण मंदिर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. प्रदीप नरेंद्र उर्फ प्रदीप महाराज पंजाबी यांनी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक मान्यताप्राप्त श्री चक्रधर स्वामी महाविद्यालय, अंबड येथून एम.ए. संस्कृत साहित्य परीक्षेत महाविद्यालयातून चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अध्यात्म, समाजकार्य आणि शिक्षण यांचा समतोल साधत मिळविलेल्या या यशामुळे महानुभाव पंथीय समाजासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक सेवेसोबतच उच्च शिक्षणाची वाटचाल कायम ठेवत त्यांनी युवकांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.



त्यांच्या या यशाबद्दल जळगाव जिल्हा महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत पांढरीकर बाबा तळेगावकर, अखिल भारतीय महानुभाव युवा परिषदेचे सचिव आचार्य मानेकर बाबा, श्रीकृष्ण मंदिर संस्थानचे अध्यक्ष आचार्य चोरमागे बाबा तसेच विविध सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रावेर परिसरात खरिपाची पिके डोलू लागली

## निंदणी, कोळपणीच्या कामांना वेग; मजूरटंचाई जाणवू लागली

रावेर : (स. गांवकरी)

उशिरा का होईना, मात्र दमदार पावसाने रावेर तालुक्यात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. पावसामुळे तालुक्यातील खरिपाची पिके जोमाने वाढू लागली असून शेतशिवार हिरवेगार झाले आहे. पिकांच्या अंतर्गत मशागतीला वेग आला असून निंदणी, कोळपणीसह अन्य शेतीकामांसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे.



मध्य प्रदेशाच्या सीमेलगत असलेल्या रावेर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र तीन वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनींमध्ये विभागलेले आहे. तालुक्याच्या मध्य भागात काळी माती, तापी नदीकाठच्या परिसरात पांढरी माती, तर सातपुडा पर्वतरांगांच्या लगतच्या भागात मुरमाड व दगडी स्वरूपाची जमीन आढळते. त्यामुळे या तिन्ही भागांत भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळी पिके घेतली जातात.

काळ्या जमिनीच्या भागात ज्वारीचा पेरा मोठ्या प्रमाणावर केला जातो. तापी नदीकाठच्या भागात मका व कापूस ही प्रमुख पिके आहेत. तर लालसर व मुरमाड जमिनीच्या क्षेत्रात भुईमूग, चवळी, उडीद, मूग यांसह विविध कडधान्यांची पिके घेतली जातात. रावेर तालुक्याची प्रमुख ओळख असलेल्या केळीचे पीकही मोठ्या क्षेत्रावर घेतले जाते. तालुक्यातील सुमारे ७० ते ७५ टक्के क्षेत्र केळीच्या लागवडीखाली असल्याचे सांगितले जाते. रावेर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र मोठे असून तालुक्यात सुमारे १२० गावे आहेत. त्यापैकी २४ गावे पूर्णपणे आदिवासीबहुल आहेत.

तालुक्यात चार धरणे असून, मध्य प्रदेशाच्या सीमेलगत असलेल्या या तालुक्याची ‘केळीचा तालुका’ म्हणून राज्यभरात ओळख आहे.

यंदा पावसाने सुरुवातीला पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली होती. पेरणी झाल्यानंतर पावसाची प्रतीक्षा लागून राहिली होती. मात्र, काही दिवसांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या दमदार पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. आता खरिपाची पिके डोलू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

पावसामुळे शेतातील अंतर्गत मशागतीच्या कामांनाही वेग आला आहे. निंदणी, कोळपणी आणि अन्य कामे एकाच वेळी सुरू झाल्याने तालुक्यात मजुरांची मोठी मागणी निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक भागांत मजूरटंचाई जाणवत आहे. विशेषतः तापी नदीकाठच्या परिसरातील शेतीकामांसाठी आदिवासी भागातील मजुरांना मोठी मागणी असून, शेतकरी खासगी वाहनांद्वारे मजुरांना कामासाठी शेतावर आणत आहेत.

पावसाने साथ दिल्याने यंदाचा खरिपाचा हंगाम चांगला जाण्याची आशा शेतकऱ्यांना लागली असून, आगामी काळातील पावसाची स्थिती आणि पिकांच्या वाढीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# येरवडा खुले कारागृहात ध्यान-धारणा कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

पुणे : (स. गांवकरी)

येरवडा खुले कारागृहातील बंद्यांच्या मानसिक शांततेसह सकारात्मक विचारसरणी, आत्मिक समाधान आणि आध्यात्मिक विकासाला चालना देण्यासाठी माहेर महिला प्रतिष्ठान आणि मैत्री बोध परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ८ ऑगस्ट) विशेष ‘ध्यान व शक्ती प्रवाह’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाला बंदी तसेच कारागृहातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि पुणे विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. मैत्री बोध परिवारचे संस्थापक प्रेमावतार मैत्रेय दादाश्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन तासांचे ध्यानसत्र घेण्यात आले. या सत्रामध्ये उपस्थितांना



बंदींच्या सुधारणा, पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासासाठी येरवडा खुले कारागृह प्रशासनाकडून विविध सकारात्मक व विधायक उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या ध्यान-धारणा कार्यक्रमामुळे बंद्यांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जेचा अनुभव मिळाला.

‘लोका लाइट’ तसेच दैवी शक्ती क्रियेचा अनुभव देण्यात आला. सध्याच्या धकाधकीच्या आणि अस्थिर वातावरणात समाजात प्रेम, शांतता आणि सकारात्मकता वाढविण्यासाठी आध्यात्मिक उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी संस्थापकांनी सांगितले. यावेळी बंदीवानांशी संवाद साधताना येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी प्रसिद्ध सुभाषिताचा दाखला देत आत्मज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, “नाना शास्त्र पठेन् लोका, नाना दैवत पूजनम्। आत्मज्ञान विना पार्थ, सर्व कर्म निरर्थकम्॥” माहेर महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विद्या म्हात्रे, उपाध्यक्षा निकीता लोकरे आणि सचिव डॉ. मीना सत्यशील बागे यांच्या विशेष पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाला मेघा नाईक, शैलेश नाईक, संगीता सौंदणकर, अजय देशमुख, रुद्रमुनी हुबलीमठ, संतोष सूर्यवंशी, रूपेश अ. मधमशेट्टीवार, संदीप अग्रवाल आणि हर्षल चव्हाण यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी निशा श्रेयकर, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, सुनील गायकवाड, चंद्रकांत खांदवे, हवालदार वैशाली थोरात, लता पिसे, शिपाई शैला कदम, सरला साबळे, संध्या जाधवर, सुरेखा म्हात्रे, मिसबा सय्यद, मिश्रक अभिषेक रौंदळ, अशोक होले, राकेश पवार, मोहसीन जमादार, याकूब शेख यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बंदी उपस्थित होते.

# उच्च शिक्षण, शिस्त व व्यक्तिमत्त्व विकासाचा महाविद्यालयात दिला संदेश

सोलापूर : (स. गांवकरी)



कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.सी.ए. प्रथम वर्षाच्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अनिकेत चनशेट्टी होते. प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, कौशल्य विकास उपक्रम, रोजगाराभिमुख शिक्षण आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध सुविधांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, आत्मविश्वास, कौशल्य विकास आणि सामाजिक बांधिलकी जोपासत सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य तथा ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्हिडिओ कॉलद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी उच्च शिक्षणातील संधी, कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि सातत्य यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपाली कसबे यांनी केले, तर प्रा. राहुल काळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. प्रदिप राठोड, प्रा. रोहिणी बिराजदार, प्रा. ज्योती लकडे, प्रा. गोपाळ चव्हाण, प्रा. जाधव, प्रा. पंढरीनाथ हरिदास, श्री. महेश भासगी यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी तसेच बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.सी.ए. चे नवागत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीसीसी बँकेसाठी भाजपमध्येच ‘शह-कटशह’!

- कल्याणशेट्टींच्या बैठकीनंतर दक्षिण सोलापुरात दुसऱ्या गटाची स्वतंत्र मोर्चेबांधणी
- सहकारातील समीकरणे बदलण्याची चिन्हे







सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागण्याआधीच भाजपच्या गोटात राजकीय हालचालींना वेग आला आहे. बँकेवर सत्ता मिळविण्यासाठी भाजपकडून मोर्चेबांधणी सुरू असतानाच दक्षिण सोलापूर तालुक्यात बैठका आणि गटबांधणीला सुरुवात झाल्याची चर्चा आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी माजी संचालक सुरेश हसापुरे यांच्या राजकीय वाटचालीला बळ देण्यासाठी बैठक घेतल्याची चर्चा असतानाच, भाजपमधील दुसऱ्या सहकारातील प्रभावी गटाने स्वतंत्र बैठक घेतल्याने पक्षांतर्गत राजकीय समीकरणांची चर्चा रंगली आहे. जिल्हा बँकेवर आतापर्यंत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, २०१८ पासून बँकेवर प्रशासक असल्याने आता न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मतदारयादीसाठी अर्हता तारीख जाहीर झाल्याने सोसायट्यांचे ठराव, मतदारसंघनिहाय गणित आणि संभाव्य उमेदवारांची जुळवाजुळव याला आता महत्त्व प्राप्त झाले आहे.

भाजपने जिल्हा बँक ताब्यात घेण्याची रणनीती आखली असून, त्यासाठी सहकारातील स्थानिक ताकद महत्त्वाची ठरणार आहे. अनेक विद्यमान आमदार आणि प्रभावी नेते बँकेच्या राजकारणात सक्रिय होण्याच्या तयारीत असल्याने प्रत्येक तालुक्यातील समीकरणांकडे लक्ष लागले आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी हे अक्कलकोटमधून सोसायटी मतदारसंघातून जिल्हा बँकेत प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. त्याचवेळी दक्षिण सोलापूरमध्ये माजी संचालक सुरेश हसापुरे यांच्यासाठी बैठक घेतल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. या बैठकीनंतर संबंधित सोसायट्यांच्या ठरावांच्या हालचालींनाही वेग आल्याची चर्चा आहे. मात्र, या हालचालींमुळे दक्षिण सोलापुरातील भाजपच्या स्थानिक राजकारणात नवी समीकरणे तयार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कल्याणशेट्टी-हसापुरे यांच्या समीकरणाला प्रत्युत्तर म्हणून सहकारातील प्रभावी नेत्यासोबत भाजपमधील दुसऱ्या गटाने स्वतंत्र बैठक घेतल्याची चर्चा आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत केवळ पक्षाचे चिन्ह किंवा राजकीय पद महत्त्वाचे ठरणार नाही. सोसायट्या, नागरी सहकारी बँका, सहकारी संस्थांमधील संपर्क आणि स्थानिक पातळीवरील मतदारांचे गणित यावर विजयाचे समीकरण अवलंबून राहणार आहे. त्यामुळे दक्षिण सोलापुरात प्रत्येक गट आपापली ताकद तपासण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.

## वरिष्ठांचा ‘ब्रेक’ की पडद्यामागे समेट?

भाजपमधील दुसऱ्या गटाने घेतलेल्या बैठकीची पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर दखल घेतल्याची चर्चा आहे. पक्षांतर्गत मतभेद निवडणुकीच्या मैदानात उघड होऊ नयेत, यासाठी वरिष्ठांकडून समन्वय साधण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे दक्षिण सोलापुरातील विद्यमान आमदारांची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसल्याने पुढील राजकीय गणित अधिक रंजक झाले आहे. त्यामुळे आगामी काळात कोणता गट कोणाच्या मागे उभा राहतो, सोसायट्यांचे ठराव कोणाच्या बाजूने जातात आणि अखेरीस भाजपमध्येच सहमती होते की स्वतंत्र पॅनेलची तयारी सुरू होते, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. डीसीसी बँकेच्या निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या या हालचालींमुळे दक्षिण सोलापुरातील भाजपच्या राजकारणात ‘एकजुटी’पेक्षा ‘ताकद कुणाची?’ हा प्रश्न सध्या अधिक चर्चेत आला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## स्मार्टकार्ड नोंदणीसाठी महिला-ज्येष्ठांची गैरसोय; नियोजनाचा बोजवारा

■ तासनतास रांगेत उभे राहण्याची वेळ; बायोमेट्रिक यंत्रणा वारंवार बंद पडल्याने नागरिक त्रस्त!

मंचर (स. गांवकरी) : राज्य परिवहन महामंडळाकडून ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक असताना पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील मंचर एसटी बसस्थानकात मात्र नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. स्मार्ट कार्ड नोंदणीसाठी वापरण्यात येणारे बायोमेट्रिक उपकरण अनेकदा बंद पडत असल्याने नोंदणीचे काम ठप्प होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. यामुळे दूरवरून आलेल्या ज्येष्ठ नागरिकांना आणि महिलांना बराच वेळ प्रतीक्षा करूनही नोंदणी न करताच परतावे लागत आहे. यंत्रणा सुरळीत नसल्याने नागरिकांना पुन्हा-पुन्हा बसस्थानकात हेलपाटे मारावे लागत असून, संबंधित यंत्रणेच्या नियोजनाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना सवलतीच्या प्रवासाचा लाभ मिळावा, यासाठी सुरू करण्यात आलेल्या योजनेतच लाभार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे. मंचर बसस्थानकात अतिरिक्त नोंदणी केंद्र सुरू करावे, पुरेशी कर्मचारी व्यवस्था करावी आणि बायोमेट्रिक यंत्रणा कायमस्वरूपी सुरळीत ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून स्मार्ट कार्ड नोंदणी प्रक्रिया सुलभ करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## विडी कामगारांना ₹३७९ किमान वेतनाचा मार्ग झाला मोकळा

■ सिटूच्या पाठपुराव्याला यश; दत्तनगरमध्ये हजारो कामगारांचा विजयोत्सव

सोलापूर (स. गांवकरी) : विडी कामगारांच्या किमान वेतनाच्या हक्कासाठी सिटूच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या तब्बल २९ वर्षांच्या लढ्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने विडी कामगारांसाठी झोन-१ मध्ये प्रतिदिन ३७९ रुपये, तर झोन-२ मध्ये ३६१ रुपये किमान वेतन लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शासनाने निश्चित केलेल्या वेतनाची अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ज्येष्ठ कामगार नेते कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली लाल बावटा विडी कामगार युनियनने गेल्या अनेक वर्षांपासून किमान वेतनाच्या मागणीसाठी सातत्याने संघर्ष केला. शासनाने १४ नोव्हेंबर २०१४ रोजी विडी कामगारांसाठी किमान वेतन व विशेष भत्ता अधिसूचित केला होता. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने कामगार संघटनेने शासन व प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या प्रश्नावर कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ मे, २० मे आणि २ जून २०२६ रोजी संबंधित अधिकारी, कामगार संघटना व विडी उद्योग प्रतिनिधींच्या बैठका झाल्या. त्यानंतर विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायातून २०१४ मध्ये निश्चित केलेले वेतनदर वेतन संहिता, २०१९ अंतर्गत वैध व अंमलबजावणीयोग्य असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, काही ठिकाणी किमान वेतनापेक्षा कमी मजुरी स्वीकारण्यासाठी कामगारांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोप सिटूने केला आहे. अशा प्रकारचा दबाव सहन केला जाणार नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले. या निर्णयानंतर शनिवारी दत्तनगर येथील सिटूच्या मध्यवर्ती कार्यालयात हजारो विडी कामगारांच्या उपस्थितीत विजयोत्सव साजरा करण्यात आला. लाल गुलालाची उधळण, लाडू वाटप आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



## जुन्नरच्या रेल्वेसाठी आता तीव्र आंदोलनाचा निर्धार

■ "रेल्वे हा राजकीय नव्हे, तर जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न" — सत्यशील शेरकर

शिवनेरी (स. गांवकरी) : नारायणगाव : संगमनेर-आळेफाटा-नारायणगाव-राजगुरुनगर-चाकण-पुणे या मार्गावरून थेट रेल्वे सुरू करण्याच्या मागणीसाठी जुन्नर तालुक्यातील जनतेने आता तीव्र आंदोलनाची भूमिका घेतली आहे. नारायणगाव येथे रेल्वेच्या मागणीसाठी आयोजित रास्ता रोको आंदोलनाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी आगामी काळात होणाऱ्या तीव्र आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. सत्यशील शेरकर म्हणाले, "नारायणगाव मार्गे रेल्वे झाली पाहिजे, ही जुन्नर तालुक्यातील जनतेची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. या मागणीसाठी खासदार डॉ. अमोल कोल्हे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. त्याबद्दल खासदार कोल्हे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. रेल्वे हा जुन्नर तालुक्याच्या अस्मितेचा विषय आहे." ते पुढे म्हणाले की, खेड येथे विमानतळ होणार असल्याचे यापूर्वी सांगितले जात होते. विमानतळामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला बाजारपेठ मिळेल, उद्योगधंद्यांना चालना मिळेल आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा होती. मात्र, विमानतळाचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही. त्यामुळे जुन्नर तालुक्यात रेल्वे सुरू झाल्यास विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करण्यासाठी तसेच उद्योग-व्यवसायांना नाशिक, मुंबई आणि पुणे या प्रमुख शहरांशी जोडण्यासाठी मोठी सुविधा उपलब्ध होईल. "रेल्वे आणि पर्यटनाच्या माध्यमातून जुन्नर तालुक्याचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. त्यामुळे रेल्वेच्या मागणीसाठी आगामी काळात तीव्र आंदोलन करावे लागले, तरी त्यासाठी जनता सज्ज राहील," असे शेरकर यांनी स्पष्ट केले.

# नारायणगाव-ओझर-ओतूर मार्गावरील एसटी बस सातत्याने उशिरा

## विद्यार्थी, पालक व नागरिकांचे हाल; वेळापत्रकात बदल करण्याची मागणी

नारायणगाव : (स. गांवकरी)

नारायणगाव-तीर्थक्षेत्र ओझर-ओतूर मार्गावर धावणाऱ्या एसटी बस सायंकाळच्या वेळेत सातत्याने उशिरा येत असल्याने जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नारायणगाव एसटी बसस्थानकावर विद्यार्थ्यांना बसची प्रतीक्षा करावी लागत असून, वेळेवर बस उपलब्ध होत नसल्याने त्यांचे शैक्षणिक व दैनंदिन कामकाज प्रभावित होत आहे. विद्यार्थी व नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, नारायणगाव बसस्थानकावरून सायंकाळी ४.४५ वाजता नारायणगाव-ओझर-ओतूर बस आहे. मात्र, ओतूरपर्यंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या बसचा अपेक्षित उपयोग होत नसल्याचे सांगण्यात



येत आहे. तसेच सायंकाळी ५.३० वाजता नारायणगाव-ओझर बस असून, ओझरच्या पुढील भागातील तसेच ओतूर परिसरातील विद्यार्थ्यांना तिचा पुरेसा फायदा होत नाही.

नारायणगाव-ओझर-ओतूर मार्गावरील सायंकाळी ६ वाजताची बसही अनेकदा वेळेवर येत नसल्याची तक्रार विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी केली आहे. याबाबत नारायणगाव आगारातील चौकशी कार्यालय तसेच संबंधित कार्यालयांकडे वेळोवेळी विनंती करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, ओतूर बसस्थानकावर उतरलेल्या विद्यार्थ्यांना पुढे चार ते पाच किलोमीटर अंतर पायी जावे लागत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. तसेच परिसरात बिबट्या व इतर वन्यप्राण्यांचा वावर असल्याने सायंकाळच्या वेळी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही बससेवा वेळेत उपलब्ध होणे आवश्यक असल्याची मागणी पालकांकडून होत आहे. पुणे-नारायणगाव-ओझर-ओतूरमार्गे खिरेश्वरकडे जाणारी एसटी बसही भोसरी, चाकण, खेड आदी भागांतील वाहतूक कोंडीमुळे सायंकाळी नारायणगाव येथे उशिराने पोहोचते. त्यामुळे या बससेवेचाही विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याचे सांगण्यात येत आहे.

या समस्येची दखल घेऊन नारायणगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे तसेच नारायणगाव एसटी आगार कार्यालय कोणता निर्णय घेणार, याकडे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. सायंकाळच्या वेळेत विद्यार्थ्यांना सोयीची आणि वेळेत बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी वेळापत्रकात आवश्यक बदल करण्याची मागणी जोर धरत आहे.

### निर्णयाकडे लक्ष

सायंकाळच्या वेळेत विद्यार्थ्यांसाठी वेळेवर बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी नारायणगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे आणि नारायणगाव एसटी आगार कार्यालय काय निर्णय घेणार? याकडे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## चिल्हेवाडी शाळेत ३२वा जागतिक आदिवासी दिन संपन्न

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

संयुक्त राष्ट्रसंघाने ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्याचे १९९४ मध्ये ठरवले त्यानुसार आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिल्हेवाडी येथे आदिवासी दिन साजरा करण्यात आला.आदिवासी संस्कृतीची ओळख व्हावी आपल्या संस्कृतीचे जतन व्हावे या उद्देशाने आदिवासी दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आदिवासी दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतातून सांगितले व आपल्या संस्कृती वर आधारित गीत सादर केले. आदिवासी वेशूभूषेत नटलेले विद्यार्थी आजच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.सदर कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती ग्रामस्थ,सरपंच,उपसरपंच व सर्व सदस्य, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक प्रभाकर दिघे व उपशिक्षक जनार्दन केदारी यांनी केले.

# स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतरही भांगलेवाडी रस्त्याच्या प्रतीक्षेत!

पावसाळ्यात चिखलातून वाट काढण्याची ग्रामस्थांची कसरत; आदिवासी भागातील दुर्लक्षाबाबत संतप्त सवाल!





आंबेगाव : (स. गांवकरी)

देशाने स्वातंत्र्याची ७९ वर्षांची वाटचाल पूर्ण केली असली तरी आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील काही वाड्या-वस्त्या आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे चित्र आहे. असाणे येथील भांगलेवाडीमध्ये आजही रस्ता म्हणजे चिखल, खड्डे आणि त्रासदायक प्रवास अशीच परिस्थिती आहे. पावसाळा सुरू होताच या वस्तीतील नागरिकांची रोजचीच कसरत सुरू होते. शाळेत जाणारी मुले, आजारी वृद्ध नागरिक, महिला तसेच शेतकऱ्यांना चिखलातून वाट काढत प्रवास करावा लागत आहे.

रुग्णांना रुग्णालयात नेणे म्हणजे मोठे संकट अशी गंभीर परिस्थिती येथे निर्माण झाली आहे. पावसामुळे रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होत असल्याने वाहनांची ये-जा करणेही अवघड बनते. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक निवडणुकीपूर्वी रस्त्याचे आश्वासन दिले जाते; मात्र निवडणूक संपल्यानंतर भांगलेवाडीचे नावही कोणाला आठवत नाही. एखाद्या बैठकीत या रस्त्याचा विषय उपस्थित केला असता, कार्यकर्ते आणि अधिकारीच 'तुमची वस्ती कुठे आहे?' असा प्रश्न विचारतात, अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. रस्त्यासाठी अनेक वेळा तक्रारी व निवेदने देऊनही अद्याप ठोस परिणाम झालेला नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्वातंत्र्यानंतर ७९ वर्षे उलटूनही साधा रस्ता मिळणे हेच जर आमच्यासाठी स्वप्न ठरत असेल, तर हा विकास आहे की आदिवासी भागाकडे केलेले दुर्लक्ष? असा संतप्त सवाल भांगलेवाडीतील नागरिकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष पाहणी करून भांगलेवाडीच्या रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# वटवृक्ष देवस्थान ट्रस्टने आध्यात्मासह सामाजिक, शैक्षणिक कार्याला दिलेलं प्राधान्य कौतुकास्पद - सुषमाताई अंधारे

अक्कलकोट : (स. गांवकरी)

श्री वटवृक्ष देवस्थान ट्रस्टने आध्यात्मासह सामाजिक, शैक्षणिक कार्याला दिलेलं प्राधान्य कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन शिवसेनेच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांनी केले. शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांचा वटवृक्ष देवस्थान कार्यालयात श्री स्वामी समर्थ महाराज यांचे कृपावस्त्र पांघरुण मंदिर समितीचे व्यवस्थापक श्रीशैल गवंडी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला याप्रसंगी अंधार बोलत होत्या.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान ट्रस्टने आध्यात्मासह सामाजिक, शैक्षणिक कार्याला दिलेलं प्राधान्य कौतुकास्पद असल्याचे मनोगत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या तसेच जिल्हा संपर्क प्रमुख सुषमाताई अंधारे यांनी व्यक्त केले. आज जिल्हा संपर्क प्रमुख सुषमाताई अंधारे यांनी येथील



श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीशैल गवंडी यांनी सुषमाताई अंधारे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी सुषमाताई अंधारे बोलत होत्या. पुढे बोलताना सुषमाताई अंधारे म्हणाल्या की वटवृक्ष देवस्थान समितीचे कार्य अतिशय स्वच्छ, शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने चालवले जाते. भाविकांसाठी असलेल्या सर्व सोयी-सुविधा पाहून मनाला समाधान मिळाले आहे. अशा देवस्थानांमुळे आपला सांस्कृतिक वारसा जपला जातो. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मंदिरात त्यांच्या समोर माझा सत्कार सोहळा संपन्न झाल्याने खूप बरे वाटले असे सांगून मंदिर समितीच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे पुरुष व महिला भगिनी पदाधिकारी जिल्हा प्रमुख शरणराज केंगनाळकर, उमेश सारंग, संजय पोळ, हुकूमचंद राठोड, दत्ता माने, रमेश चौगुले, रवी डोके, सोपानकाका निक्ते, अयाज जमादार, मनोज पवार, गुरुलिंगप्पा पाटील, रवी कोळी, पिंटू पांढरे, राम जाधव, भिम जाधव, राजशेखर गुरव, संतोष पाटील संतोष टोणपे, महेश फुलारी तसेच सचिव आत्माराम घाटगे, सागर गोंडाळ, रमेश शिंदे सर, सचिन हन्नूरे आदींसह स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीची जाहिरात प्रसिद्ध

■ ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून प्राथमिक शिक्षकांच्या ५२६ पदांची भरती

ठाणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या पवित्र (PAVITRA) पोर्टलद्वारे शिक्षक भरती प्रक्रियेंतर्गत जिल्हा परिषद, ठाणेच्या शिक्षण विभागामार्फत प्राथमिक शिक्षक पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या भरती प्रक्रियेत मराठी माध्यमाची ४९९ पदे तसेच उर्दू माध्यमाची २७ पदे, अशी एकूण ५२६ प्राथमिक शिक्षक पदे उपलब्ध करण्यात आली आहेत. जिल्हा परिषद, ठाणेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी भरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात काळजीपूर्वक वाचून त्यामध्ये नमूद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, पात्रता निकष तसेच आरक्षणासंदर्भातील तरतुदी तपासणे आवश्यक आहे. या भरतीमध्ये मराठी माध्यमासाठी ४९९ आणि उर्दू माध्यमासाठी २७, अशी एकूण ५२६ प्राथमिक शिक्षक पदे उपलब्ध आहेत. संबंधित पदांसाठी शासनाने निर्धारित केलेल्या नियमांनुसार पात्र उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर आपला पसंतीक्रम (Preference) नोंदविणे आवश्यक आहे. उमेदवारांनी पसंतीक्रम भरताना जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची काळजीपूर्वक माहिती घेऊनच प्रक्रिया पूर्ण करावी.

# आवक घटल्याने कर्टूल्यांचे भाव गगनाला ३०० रु किलोवर

## अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने जंगलतोडीचा मोठा फटका

रावेर : (स. गांवकरी)

पावसाळ्याचे आगमन होताच निसर्गाच्या कुशीत नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या विविध रानभाज्यांची रेलचेल बाजारात पाहायला मिळते. या सर्व रानभाज्यांमध्ये अत्यंत चवदार, पौष्टिक आणि आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी मानल्या जाणाऱ्या 'कर्टूल' (करटुले) या रानभाजीला ग्राहकांकडून नेहमीच मोठ्या प्रमाणार मागणी असते. मात्र, यंदा बाजारात कर्टूल्यांची आवक मोठ्या प्रमाणावर घटल्यामुळे त्याचे दर प्रचंड भडकले असून, किरकोळ बाजारात कर्टूले तब्बल ३०० रुपये प्रति किलो दराने विकले जात आहेत. वाढत्या महागडीमुळे ही आवडती रानभाजी आता सर्वसामान्यांच्या ताटातून गायब होण्याच्या मार्गावर आहे. पावसाळ्याच्या दिवसांत शरीराला आवश्यक असणारी खनिजे आणि जीवनसत्त्वे रानभाज्यांमधून मुबलक प्रमाणात मिळतात. त्यातही 'कर्टूल' ही रानभाजी औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण मानली जाते. रक्तशर्करा नियंत्रणात ठेवणे, पचनक्रिया सुधारणे आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी कर्टूल्याचे सेवन अत्यंत लाभदायक असल्याचे सांगितले जाते. यामुळेच सातपुड्याच्या कुशीत असलेल्या पालसह संपूर्ण परिसरात आणि शहर-ग्रामीण भागात पावसाळ्यात कर्टूल्याची भाजी खाण्याला नागरिक प्रथम पसंती देतात. बाजारात कर्टूले दिसताच नागरिक कोणत्याही दराने ते खरेदी करण्यासाठी पुढे येतात.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कर्टूल्यांची आवक कमालीची घटली आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच बाजारात कर्टूल्यांची मोठी आवक दिसून यायची, ज्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना रास्त दरात ही रानभाजी उपलब्ध होत असे. परंतु, यावर्षी परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आवक कमी आणि मागणी प्रचंड, असे चित्र निर्माण झाल्याने , विक्रेत्यांनी भावात मोठी वाढ केली आहे. सध्या ३०० रुपये प्रती किलोचा टप्पा गाठल्यामुळे खवय्यांच्या खिशाला चांगलाच फटका बसत



आहे. दिवसभर फिरूनही १ किलो कर्टूले मिळणे कठीण असल्याचे स्थानिक आदिवासी वांधव व ग्रामीण भागात भागातील नागरिक सांगत आहेत. दरवर्षी पावसाळ्यात जंगलात जाऊन कर्टूले गोळा करतात आणि ते बाजारात विकून आपला मोसमी रोजगार भागवतात. मात्र, यंदा जंगलातील चित्र अत्यंत चिंताजनक आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, पूर्वी काही तासांतच टोपलीभर कर्टूले सहज मिळत असत मात्र आता दिवसभर डोंगराळ भागात व घनदाट जंगलात मैलोन्मैल भटकंती करूनही १ किलो कर्टूले गोळा करणे अत्यंत कठीण झाले आहे. त्याच प्रमाणे कर्टूल्याच्या वेली शोधण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी जंगलतोड ठरतेय मुख्य कारण.कर्टूल्यांची आवक इतक्या मोठ्या प्रमाणावर घटण्यामागे वाढती 'जंगलतोड' हे सर्वात मुख्य आणि गंभीर कारण मानले जात आहे. पाल व लगतच्या परिसरात वृक्षतोड आणि अतिक्रमणांमुळे नैसर्गिक जंगल क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. कर्टूल्याची वेल ही मानवनिर्मित नसून ' ती नैसर्गिकरीत्या झाडांच्या आणि झुडपांच्या आधाराने वाढते. मात्र, वृक्षतोडीमुळे या वेलींचा नैसर्गिक अधिवास नष्ट होत चालला आहे. याशिवाय हवामानात झालेला बदल आणि पावसाची अनियमितता यामुळेही कर्टूल्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे.

# दिव्याला पोलीस स्टेशन, सरकारी हॉस्पिटलसह मूलभूत सुविधांची गरज - वंचित

ठाणे : (स. गांवकरी)




दिवा शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता दिव्यात स्वतंत्र व सक्षम नवीन पोलीस स्टेशन उभारण्याची गरज आहे. त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांसाठी सुसज्ज सरकारी रुग्णालयाचीही तितकीच आवश्यकता असल्याचे दिवा वंचित बहुजन आघाडीचे विकास इंगळे यांनी स्पष्ट केले आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांची संख्या, सुविधा आणि कार्यक्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. मात्र केवळ पोलीस स्टेशनची घोषणा किंवा मागणी करून प्रश्न सुटणार नाही. दिव्यात सध्या साथीचे आजार व डेंगू रुग्ण वाढू लागले असून एखादी गंभीर वैद्यकीय परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना उपचारासाठी ठाणे, कळवा किंवा इतर भागात धाव घ्यावी लागते. त्यामुळे दिव्यात मोठे आणि सर्वसामान्यांना परवडणारे रुग्णालय कधी होणार ? हा प्रश्नही लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने घ्यायला हवा. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या मुद्द्यावरून राजकारण करणे कितपत योग्य आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महापुरुष कोणत्याही एका समाजाचे नसतात. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वे आहेत.

त्यामुळे त्यांच्या नावाचा वापर राजकीय श्रेय घेण्यासाठी नव्हे, तर सन्मानपूर्वक आणि कायदेशीर पद्धतीने काम पूर्ण करण्यासाठी व्हायला हवा. लोकप्रतिनिधींनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा दिव्याच्या नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे दिवा वंचित बहुजन आघाडीचे विकास इंगळे यांनी स्पष्ट केले आहे.




ठाणे ता ९ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा दिवा शहरात उभारावा यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळीतील विविध संघटनांकडून पाठपुरावा सुरू आहे. मागील आठवड्यात याच मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण केले होते. प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. रविवार, ९ ऑगस्ट रोजी दिव्यातील प्रमुख आंबेडकरी चळवळीतील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये लवकरच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...

### साथींच्या आजारांवर तातडीने उपाययोजना करा : योगिता नाईक



ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात साथीच्या आजासह डेंग्यू व मलेरियाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) दिवा वतीने ठाणे महानगरपालिकेकडे तातडीने औषध फवारणी व धूर फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दिवा शहरातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कल्याण ग्रामीण विधानसभा संघटक सौ. योगिता हेमंत नाईक यांनी सहाय्यक आयुक्त, दिवा प्रभाग समिती यांना दिलेल्या निवेदनात दिवा शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर उघडी गटारे व साचलेल्या पाण्यामुळे डासांचे प्रमाण वाढले असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. शहरात डेंग्यू व मलेरियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळत असल्याने महापालिकेने तातडीने औषध फवारणी आणि धूर फवारणीची मोहीम राबवावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींशी चर्चा करणार - खासदार बाळ्या मामा

ठाणे (स. गांवकरी) : राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या नेत्या सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व खासदार सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत भेट घेणार आहेत.या भेटीदरम्यान भिवंडीतील टोरंट पावर हटविण्यासंदर्भात थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करणार असून टोरंट पॉवर बरोबरच मुरबाड रेल्वे, व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व.दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे अशा तीन मुद्द्यांवर पंतप्रधानांची चर्चा करणार असल्याची माहिती भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी दिली आहे. रविवारी एका जाहीर कार्यक्रमात बोलताना खासदार बाळ्या मामा यांनी ही माहिती दिली आहे. भिवंडीतील टोरेंट पॉवरची मुदत जानेवारी २०२७ मध्ये संपणार असून त्यापूर्वी टोरंट पावरचा पुढील कालावधीत वाढ करू नये अथवा मुदत वाढ देण्यात येऊ नये या मागणीसाठी संसदीय अधिवेशनानंतर रणनीती आखणार असून यासाठी भिवंडीत भव्य आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती देखील खासदार बाळ्या मामा यांनी यावेळी दिली आहे.

### वीरगाव येथे वृक्षारोपण




अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील वीरगाव येथील आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे व सेक्रेटरी डॉ.अनिल रहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज,विरगाव वीरगाव ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने अकोले तालुक्यातील वीरगाव येथे भवानी माता मंदिर परिसरातील डोंगरावर मोठ्याप्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आनंदगड शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष तथा अमृतसागर दूध संघाचे व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे,उपसरपंच जयवंत थोरात, ग्रामसेविका नेहे मॅडम, शिवराज वाकचौरे,को- ऑर्डीनेटर विद्याचंद्र सातपुते, प्राचार्य विनोद गिरी, प्रा.अजित येलमामे,प्रा.प्रिया वाघ,प्रा.आकाश डोखे,प्रा.झरेज बागवान,प्रा.पूजा शेळके,प्रा. अनिता पथवे,प्रा.भारती तोरकड,प्रा.योगेश घोलप, ग्रामपंचायत गणेश अस्वले,गणेश कुमकर,ग्रामपंचायत कर्मचारी आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते पर्यावरण संरक्षण व विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी व सजीव सृष्टी जगविणे या हेतूने दरवर्षी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने वृक्षारोपण केले . वृक्षारोपण यशस्वी करण्यासाठी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज चे प्रा.अजित येलमामे,प्रा.प्रिया वाघ,प्रा.आकाश डोखे,प्रा.झरेज बागवान,प्रा.पूजा शेळके,प्रा.अनिता पथवे,प्रा. भारती तोरकड,प्रा.योगेश घोलप, ग्रामपंचायत वीरगाव चे गणेश कुमकर, यांसह सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.तर ही सर्व झाडे जगविण्यासाठी ग्रामपंचायत वीरगाव ने जबाबदारी घेतली असल्याने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वन भोजनाचा आनंद घेतला.व वृक्षारोपण करण्याबरोबर हिरवा शालू पांघरलेल्या निसर्गाच्या सानिध्यात सुरुची भोजनासह आनंद घेतला.

### दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात क्रांती दिन साजरा



आळेफाटा (स. गांवकरी) : श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित , दिलीप वळसे पाटील कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा, तालुका -जुन्नर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत 9 ऑगस्ट क्रांती दिन, राष्ट्रीय सेवा योजना विभाग एकक उद्घाटन समारंभ व जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला . क्रांती दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना एकक उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिल पडवळ यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा. सुभाष घोडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाची उद्दिष्टे व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील त्याचे महत्त्व स्पष्ट केले.

## आ. प्रतापराव पाटील चिखलीकर : वाढदिवसानिमित्त भव्य सोहळा

बिलोली : (स. गांवकरी)




लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी बिलोली येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळा व शालेय साहित्य (बॅग) वाटप कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. वाढदिवसानिमित्त आयोजित या लोककल्याणकारी उपक्रमाने संपूर्ण परिसरात एकच चर्चा रंगली असून, आमदार महोदयांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कार्यक्रमाचे औचित्य साधून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. आमदार चिखलीकर साहेबांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली होती. कार्यक्रमादरम्यान ड्रोन कॅमेरा आणि जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली, तर क्रेनच्या सहाय्याने भलामोठा हार घालून त्यांचा अत्यंत दणक्यात सत्कार करण्यात आला. या नेत्रदीपक आणि आकर्षक स्वागताने उपस्थितांचे मन जिंकले.

या दिमाखदार सोहळ्याला राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती. यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार सुभाषराव साबणे,माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा

मिनलताई पाटील खतगावकर (संचालक, जिल्हा मध्यवर्ती बँक, नांदेड)यादवराव तुडमे (माजी नगराध्यक्ष)प्रतापराव पाटील जिगळेकर, अशोक पाटील मुगावकर, सरजितसिंग गिल, आनंद बिराजदार, अभिजित तुडमे, गिरजाबाई मेडेकर,आदिमान्यवर उपस्थित होते. हा सोहळा ऐतिहासिक व यशस्वी करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन युवा जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, तालुकाध्यक्ष रंजित पाटील हिवराळे, श्रीनिवास पाटील गुजरीकर, यांनी केले होते तर यावेळी इंद्रजित तुडमे, सय्यद रियाज, मिलिंद मांजरमकर , निळकंठ दुडले ,माणिक हिवराळे ,बालाजी पाटील कांगटीकर,संभाजी नरवाडे, ज्ञानेश्वर पाटील नरवाडे ,केदार पाटील ढगे , निखिल मुंगडे यशवंत पाटील ,गणेश नरवाडे ,आनंदा पाटील हिवराळे, लक्षमन नागरे, परमेश्वर निवळे,सचिन मुरखे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व नियोजनबद्ध आयोजनाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## अमेरिकेच्या भूमीवर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा जागर!

सिएटल, अमेरिका : (स. गांवकरी)



- 'द फोक आख्यान' टीमचे Aamrai Indian Kitchen & Bar, Seattle येथे उत्साहात स्वागत

महाराष्ट्राची समृद्ध लोककला, संस्कृती, परंपरा आणि आपल्या मातीचा इतिहास सातासमुद्रापार पोहोचवणाऱ्या 'द फोक आख्यान' टीमचे सिएटल येथील Aamrai Indian Kitchen & Bar मध्ये अत्यंत आत्मीयतेने आणि मराठमोळ्या आदरातिथ्याने स्वागत करण्यात आले. या विशेष प्रसंगी हर्षल राऊत, विजय कापसे आणि रुचा कुलकर्णी यांनी आमराई येथे भेट देऊन भोजनाचा आस्वाद घेतला. त्यांच्या उपस्थितीमुळे आमराई परिवारासाठी हा क्षण अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि संस्मरणीय ठरला. आज महाराष्ट्रातील कलाकार आपल्या कलेच्या माध्यमातून जगभर प्रवास करत मराठी संस्कृतीची पताका अभिमानाने फडकवत आहेत. लोककला, परंपरा, इतिहास आणि महाराष्ट्राच्या मातीतल्या अस्सल कथा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'द फोक आख्यान' करत आहे. परदेशात राहणाऱ्या मराठी माणसासाठी अशा कलावंतांची भेट म्हणजे केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नसतो, तर ती आपल्या मातीशी, भाषेशी आणि संस्कृतीशी पुन्हा जोडणारी एक भावनिक अनुभूती असते.

## जागतिक आदिवासी दिन पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा

श्रीगोंदा (स. गांवकरी)



- बिरसा मुंडा व एकलव्य यांच्या प्रतिमांचे पूजन; पारंपरिक वेशभूषेने वेधले लक्ष

श्रीगोंदा तालुक्यातील रायगव्हाण येथे एकलव्य संघटनेच्या वतीने जागतिक आदिवासी दिन पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा, शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक एकजूट यांचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महान आदिवासी स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा तसेच आदिवासी समाजातील प्रेरणास्थान एकलव्य यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व, आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली आदिवासी मुलींनी साकारलेली पारंपरिक वेशभूषा. पारंपरिक पोशाख, अलंकार आणि सांस्कृतिक सादरीकरणाच्या माध्यमातून आदिवासी समाजाची समृद्ध परंपरा प्रभावीपणे मांडण्यात आली. या वेशभूषेने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी एकलव्य संघटनेचे अध्यक्ष काळूराम निकम यांनी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीचा संकल्प व्यक्त केला. आदिवासी समाजातील प्रत्येक मुलाने शिक्षण घेतले पाहिजे, यासाठी शाळेचे महत्त्व पालक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व मुलांना शाळेत दाखल करून त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे माध्यम असून नव्या पिढीने शिक्षणाच्या बळावर विविध क्षेत्रांत प्रगती करावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## श्री क्षेत्र कपर्दिकेश्वराच्या यात्रेची जय्यत तयारी

ओतूर : (स. गांवकरी)




जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वराच्या श्रावणी सोमवार यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. श्रावण महिनाभर धार्मिक, सांस्कृतिक व वारकरी परंपरेने नटलेल्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, लाखो भाविक यात्रेसाठी दाखल होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने देवस्थान संस्था, ग्रामस्थ व प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. अशी माहिती श्री कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे यांनी दिली. जुन्नर तालुक्यातील ओतूर हे गाव ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वराच्या प्राचीन हेमाडपंथी मंदिरामुळे राज्यभर प्रसिद्ध आहे. श्रावण महिन्यात येथे भरणाऱ्या यात्रेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात. मंदिरातील शिवलिंगावर कोरड्या तांदळापासून साकारण्यात येणाऱ्या कलात्मक पिंडी हे देवस्थानाचे प्रमुख आकर्षण आहे. या अद्वितीय परंपरेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. 'हर हर महादेव'च्या जयघोषात भाविक दर्शनाचा लाभ घेतात.

श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी श्री कपर्दिकेश्वर देव-धर्म संस्था आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने विविध धार्मिक, सांस्कृतिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या श्रावणी सोमवारी (दि. १७) सकाळी ८ ते ११ या वेळेत शालेय दिंडी महोत्सव, तर दुपारी १२ ते सायंकाळी ६ या वेळेत वारकरी भजन महोत्सव होणार आहे. दुसऱ्या सोमवारी (दि. २४) सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत संगीत भजन स्पर्धा होणार आहे. तिसऱ्या (दि. ३१) व चौथ्या (दि. ७ सप्टेंबर) सोमवारी दुपारी १ ते ५ या वेळेत कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कारही करण्यात येणार आहे. यात्रेची सांगता दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत पार पडणाऱ्या शिळा आखाड्याने होणार असल्याचे अध्यक्ष अनिल तांबे यांनी सांगितले. यात्रेदरम्यान होणारी गर्दी लक्षात घेऊन ओतूर पोलीस ठाण्याच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी विशेष बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसरात भाविकांच्या गर्दीचे नियोजन, दर्शन रांगेवर नियंत्रण, वाहतूक सुरळीत ठेवणे तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्यात येणार आहे. वाहनांची कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक नियमन व आवश्यकतेनुसार वाहनांच्या मार्गात बदल करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

मंदिर परिसर, यात्रा मार्ग व गर्दीच्या ठिकाणी संशयास्पद हालचालींवर पोलिसांची विशेष नजर राहणार असून, अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी साध्या वेशातील पोलिसांचीही मदत घेतली जाण्याची शक्यता आहे. भाविकांनी मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांकडे विशेष लक्ष द्यावे तसेच पोलिस व प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येणार आहे.

यात्रेतील धार्मिक कार्यक्रम, दिंडी, भजन महोत्सव व कुस्ती आखाड्याच्या वेळी मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने गर्दी व्यवस्थापनासाठी पोलीस, ग्रामस्थ व देवस्थान संस्थेच्या स्वयंसेवकांमध्ये समन्वय ठेवण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यावरही भर देण्यात येणार आहे.

भाविकांनी शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेऊन यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी केले आहे.

## 'रोटरी क्लब'च्यावतीने महा रक्तदान शिबिर आयोजित

आळेफाटा : (स. गांवकरी)




समाजातील रक्ताची तूट भरून काढण्यासाठी आणि "रक्तदान, जीवदान" हा संदेश देण्यासाठी रोटरी क्लब ऑफ आळेफाटा सेंट्रल, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या वतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संत सावतामाळी महाराज मंदिर, आळेफाटा येथे घेण्यात आला. यावेळी एकूण २६० रक्तदात्यांना सहभाग नोंदविला. रोटरी क्लबचे ऑफ आळेफाटा सेंट्रल चे अध्यक्ष रो. वेदप्रकाश कणसे म्हणाले, "सध्याच्या काळात अपघात, शस्त्रक्रिया आणि गंभीर आजारांसाठी रक्ताची मोठी गरज असते. एक युनिट रक्त अनेकांचे जीवन वाचवू शकते. त्यामुळे अधिकाधिक तरुणांनी, नागरिकांनी या शिबिरात सहभागी व्हावे." या शिबिरासाठी आळेफाटा व्यापारी असोसिएशन, डॉक्टर्स असोसिएशन, पोलीस स्टेशन, प्राथमिक आरोग्य केंद्र आळे, संत सावतामाळी देवस्थान, जैन श्रावक संघ तसेच परिसरातील सर्व महाविद्यालये आणि परिसरातील सर्व करिअर अकॅडमी यांनी सहकार्य केले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक दात्यास रोटरी क्लबच्या वतीने आकर्षक बॅग भेट देण्यात आली. या शिबिराचे नियोजन अध्यक्ष रो. वेदप्रकाश कणसे, उपाध्यक्ष रो. संदीप लोढा, सेक्रेटरी रो. अभिषेक भागवत, संस्थापक रो. महावीर पोखरणा , सह संस्थापक रो.संजय टेंभे, सर्विस प्रोजेक्ट डायरेक्टर रो. ज्ञानेश जाधव व मेडिकल प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ. मनोज वेठेकर व डॉ. मनिषा शिंदे, आय.पी. पी. रो. सोनाली गांधी, क्लब फर्स्ट लेडी सौ.जयश्री वेदप्रकाश कणसे, रोटरी क्लबचे सर्व आजी माजी पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.



## आदर्श विद्यालयातील विद्यार्थिनींना छत्र्यांचे वाटप

पुणे : (स. गांवकरी)

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या मालिकेअंतर्गत पुण्यातील 'आदर्श विद्यालय' प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पावसाळ्यातील सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला हातभार लावण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि समाजहिताची जाणीव जोपासत विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करणे आणि समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमावेळी आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा लांजेवार, शाळेतील सर्व शिक्षिका, तसेच राम घायतिडक (पाटील), पुणे जिल्हा सरचिटणीस प्रदीप घाडगे, नरसिंग भंडारी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत 'सूर्यदत्त'चे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)